सिंधुदुर्ग, सोमवार, ४ ऑगस्ट २०१४ । किंमत ₹ तीन

* आजचा अंक : पाने १६ (१२+४)

सकाळ

# हळबे महाविद्यालयात काव्यवाचन

दोडामार्ग, ता. ३ : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात 'येरे घना येरे घना, न्हाऊ घाल माझ्या मना' अशी पावसाला साद घालणारा मेघमल्हार हा पावसावरील काव्यवाचन कार्यक्रम उत्साहात झाला. मराठी भाषा आणि वाङःमय मंडळातर्फे आयोजित या कार्यक्रमास तरुणाईने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आषाढ व श्रावण यांचा संगम होत असताना आणि धरणी माता हिरवा शालू नेसून, साज शृंगार करून नटली-सजली असताना आनंदाने बेहोश झालेली युवाई पावसात भिजते. अनिल गावडे, अक्षय राऊत, भूषण सावंत, राजेश नाईक, मनीषा वरक, प्रियांका पवार, महादेव नाईक, विमल मांजरेकर, राखी सावंत, मधू बोर्डेकर, सागर गवस इत्यादींना काव्यवाचनात सहभाग घेतला. अध्यक्षस्थानी प्राचार्य व्ही. ए. पाटील यांनी मार्गदर्शन केले. सागर गवस यांनी आभार मानले.